संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# आता वर्षभर अतिदक्षता ठेवायला हवी

**काश्मीर** खोऱ्यातून दहशतवादी पुन्हा पंजाबपर्यंत सरकला आहे, किंवा पाकिस्तानने आपल्या भारतविरोधी कारवायांना पुढे सरकवले आहे. हे गुरुदासपूरजवळ झालेल्या हल्ल्यावरून सिध्द होते. गुरुदासपूर हा जिल्हा पाकिस्तानच्या सीमेजवळ येतो. आणि सैनिकांच्या वेशात आलेल्या तीन शस्त्रधारी दहशतवाद्यांनी तिथल्या दिनानगर पोलीस स्टेशनवर आणि एका बसवर केलेल्या अंदाधुंद गोळीबारामध्ये आठ जणांना मृत्युमुखी पडावे लागले. हा हल्ला काही दिवसांपूर्वीच जम्मूमध्ये झालेल्या हल्ल्याशी मिळताजुळता असल्याचे सांगितले जाते. सुदैवाने त्या बसचालकाने चाणाक्षपणा दाखवून बस थांबवली नाही त्यामुळे फार मोठी प्राणहानी टळली. या हल्ल्यामागे नेहमीप्रमाणे लष्कर ए तोयबा किंवा जैश-ए-मोहम्मद या संघटना असाव्यात, असा अंदाज व्यक्त झाला आहे. त्या संघटना कोणत्याही असोत, परंतु आज पुन्हा एकदा पंजाबमध्ये या संकटाने तोंड वर काढल्याचे सिध्द झाले. एकेकाळी हाच पंजाब खलिस्तानवाद्यांच्या दहशतवादाने पोळला होता. आता त्याच ठिकाणी पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद जर घुसखोरी करत असेल तर, तो त्याच क्षणी ठेचून काढला गेला पाहिजे. अनेकवेळेला हे असे प्रकार घडल्यानंतर त्याचा भेकड हल्ला म्हणून निषेध केला जातो. परंतु ज्या पध्दतीने या हल्ल्यात लोक मृत्युमुखी पडतात आणि सुरक्षा यंत्रणांना गुंगारा देऊन ते आपला कार्यभाग साधतात. ते पाहिल्यावर हल्लेखोरांना भेकड म्हणण्यापेक्षा त्यांना भारतातल्या सुरक्षायंत्रणांचा धाक वाटत नाही. किंवा भारतात आपण केव्हाही वाटेल त्या पध्दतीने मृत्यूचे तांडव करू शकतो, असे धैर्य या दहशतवाद्यांमध्ये निर्माण होते. यावरून ते भेकड ठरत नाहीत. तर त्यांना नेस्तनाबूत करणारे धैर्य आपल्या सरकारमध्ये नाही, हेच त्यातून सिध्द होते. आणि सरकारच यासंदर्भात भेकड ठरते. पंजाबमधला हा हल्ला भविष्यातील मोठ्या संकटाची चाहूल ठरू शकतो.

सरकारने या प्रकाराची नेमकी काय दखल घेतली आहे, हे स्पष्ट झाले आहे. आज देशाच्या सुरक्षा व्यवस्थेवर अब्जावधी रुपयाचा खर्च होतो. तरीदेखील दहशतवादी आपला उद्देश साध्य करताना दिसतात. याचा अर्थ एकूणच आपल्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये फार मोठ्या उणिवा आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. आणि त्या दूर करण्याकरता तितक्याच वेगाने आणि गांभीर्याने उपाययोजना करावी लागेल. कारण विशिष्ट कालावधीनंतर किंवा मधूनच केले जाणारे हे हल्ले सरकारकडून नंतर दुर्लक्षित होतात. हल्ला झाला की देशभर रेड अॅलर्ट दिला जातो. चौकाचौकात जिकडे तिकडे पोलीस दिसायला लागतात. आणि नंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण होते. उलट दहशतवादाचे हे आव्हान लक्षात घेऊन कायमस्वरूपी रेड अॅलर्ट ठेवण्याची वेळ आली आहे.

## दहशतवाद्यांना अभय

गेली चाळीस वर्षे भारतामध्ये दहशतवाद ठाण मांडून आहे. प्रामुख्याने काश्मीरमध्ये त्याने सर्वाधिक थैमान घातले आणि त्याच्याबरोबरीने तिथल्या ढिसाळ आणि धर्मांध राज्यकर्त्यांनी दहशतवादाला मदत करणाऱ्यांना संरक्षणही दिले. काश्मीरमधले फुटीरतावादी ही त्या समर्थनाची कटू फळे आहेत. उघडपणे पाकिस्तानचा झेंडा फडकवला जातो. भारताचा तिरंगा जाळला जातो आणि तरी त्या भारतविरोधी काम करणाऱ्या या फुटीरतावाद्यांविरुध्द कारवाई होत नाही. उलट पाकिस्तानातून येणारे त्यांचे सनदी अधिकारी आणि कधीकाळी मंत्रीसुध्दा या फुटीरतावाद्यांची भेट घेतात. त्यांचा काश्मीरमधले स्वातंत्र्यसैनिक म्हणून गौरव करतात. हे सगळे इतके खुलेआम चालू असताना कोणतीच ठोस उपाययोजना सरकारकडून झाली नाही. त्यातूनच हा दहशतवाद देशाच्या सगळ्या भागामध्ये पोहचला. धर्माचे कारण पुढे करून तिथल्या स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळवला. आणि म्हणून मुंबईसारख्या आर्थिक राजधानीतसुध्दा चार पाच वेळा बॉंबस्फोट झाले.

२६/११सारखा दहशतवादी हल्ला झाला. त्यातल्या हल्लेखोरांवर पाकिस्तानने कोणतीही कारवाई केलेली नाही. तिथून पोसला जाणारा हा दहशतवाद म्हणजे भारताविरुध्द खेळले जाणारे हे छुपे युध्द आहे.हे आता लपून राहिलेले नाही, प्रत्यक्ष युध्दात जेवढे नागरिक मारले जात नाहीत, त्यापेक्षा जास्त लोक या दहशतवादी हल्ल्यांमध्ये ठार मारले गेले आहेत. यासाठीच या संकटाविरुध्द युध्दपातळीवरच उपाययोजना झाली पाहिजे. ज्याप्रमाणे सीमेवरती सैन्याचा खडा पहारा असतो, त्या पध्दतीने देशभरात सुरक्षायंत्रणेचा खडा पहारा ठेवला गेला पाहिजे. गुप्तचर यंत्रणांचे असे काही जाळे निर्माण केले पाहिजे की, देशविरोधी कारवायांची इत्थंभूत माहिती आगाऊ मिळाली पाहिजे. त्याबरोबरच असे कृत्य करणाऱ्यांविरुध्द देशभर एकाच पध्दतीचा कायदा लागू झाला पाहिजे.

## बिहार निवडणुकीसाठी इशारा

पंजाबमधल्या घटनेने सुरक्षायंत्रणांमधल्या उणिवा तर दाखवून दिल्या आहेतच. परंतु भारत दहशतवादाविरुध्द कधीच कठोरपणे उभा राहू शकत नाही, असेही सिध्द केले आहे. सैनिकी वेशात दहशतवादी येतात. थेट पोलीस ठाण्यावर हल्ला करतात तोपर्यंत त्या परिसरातल्या कोणालाही त्याचा संशय येऊ नये, यावरून पोलीस स्टेशनच्या हद्दीतसुध्दा देशविरोधी किंवा विघातक कामे करणारे किती सहजपणे पोहचू शकतात, हे दिसून येते. सगळ्या प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था असताना संशयास्पद हालचाली करणाऱ्यांकडे लक्ष गेले नाही. हा हल्ला पहाटेच्यावेळी झाला म्हणजे ही गोष्ट तर आणखीनच गंभीर ठरते. रात्रीच्यावेळी जिथे पोलीस स्टेशनमध्ये जागचा पहारा नव्हता तिथे दहशतवादी कोणत्याही वेशात कसेही घुसू शकतात, हे वेगळे सांगण्याची गरजच उरत नाही. म्हणूनच देशाच्या सर्व भागांमध्ये वेळ पडल्यास पोलिसांची पाचपट संख्या वाढवून ३६५ दिवस अतिदक्षतेची सुरक्षायंत्रणा कार्यान्वित झाली पाहिजे. तरच या दहशतवाद्यांना थोडेफार रोखता येऊ शकेल. पुढच्या महिन्या दोन महिन्यांत बिहारमध्ये निवडणुका आहेत. लोकसभा निवडणुकीच्यावेळी मोदींच्या सभेपूर्वी बॉंबस्फोट घडवले गेले होते. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही आणि म्हणूनच गुरुदासपूरची ही घटना पहाता येणाऱ्या निवडणुकांमध्येसुध्दा दहशतवादी हल्ले होऊ शकतात असा इशारा देणारी ठरते.